बीड । बुधवार

१२.०३.२०२५

वर्षे : ४ अंक : ३३३

किंमत : ३ रु. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955






# सुरेश धसांना सहआरोपी करा

## धनंजय मुंडेंचे भाऊ संतापले, किती दिवस गप्प बसणार

**बीड । प्रतिनिधी**

धनंजय मुंडे यांचे भाऊ अजय मुंडे यांची आज पत्रकार परिषद पार पडली आहे. यामागे त्यांनी कारण देखील स्पष्ट केलंय की, धनंजय मुंडे साहेबांच्या आई आणि भाऊ नाराज आहेत. कौटुंबिक कलह असल्याचा आरोप सुरेश धस यांनी केला होता. हेच आजच्या पत्रकार परिषदेमागील कारण असल्याचं त्यांनी म्हटलंय. सगळ्या गोष्टी बिनबुडाच्या आहेत. सनसनाटी निर्माण करायची, यासाठी असे वक्तव्य केले जात आहे. आमच्या घरातील ज्येष्ठ व्यक्तींवर आरोप केले जात आहेत, किती दिवस गप्प बसणार. उगाचच आमच्या



कुटुंबाची बदनामी करण्याचं काम सुरू आहे. धनंजय मुंडे यांच्यामागे संपूर्ण कुटुंब आहे. दोन्ही भाऊ-बहीण मंत्री झाले, हेच विरोधकांच्या डोळ्यात खुपत आहे. धनंजय मुंडे यांची प्रकृती ठीक नसल्याकारणाने त्यांनी राजीनामा दिलाय. खरं तर परळीच्या घराचं काम सुरू आहे, त्यामुळे मुंडे यांच्या आई गावाकडे जावून राहत आहेत. त्यांच्यासोबत धनंजय मुंडे देखील त्या घरात राहतात.

धनंजय मुंडे साहेबांवर प्रेम करणारे हजारो मित्र आहे. आम्हाला केवळ संतोष देशमुख यांना न्याय द्यायचा आहे, त्यासाठी सर्व कार्यकर्ते शांत आहेत. आम्हाला सनसनाटी निर्माण करायची नाही. सुरेश धस तरी कुठे धुतल्या तांदळाचे आहेत. त्यांचा खोक्या शंभर मोरं, हरणं कापून खातो. त्यामुळे सुरेश धस यांना सुद्धा सहआरोपी करा, अशी मागणी देखील अजय मुंडे यांनी केलीय. दुसरा आरोप करायला काही राहिलं नाही, त्यामुळे कौटुंबिक हल्ले केले जात आहेत. कोणतारी आधार नसताना बेछूट हल्ले करायचे. नैतिक जबाबदारी म्हणून मी आज आपल्यासोबत बोलत आहे, असं देखील अजय मुंडे यांनी स्पष्ट केलंय. चार्जशीट मी पुर्णपणे वाचली नाही. आम्ही कोर्टाचा अवमान करत नाही, या प्रकरणात दोषींना शिक्षा झाली पाहिजे, अशी मागणी पहिल्या दिवसापासून मुंडे कुटुंबाची आहे.

आरोप राजकीय प्रेरित आहेत. तुम्ही धनंजय मुंडे साहेबांना हरवू शकत नाही, त्यामुळे असं बदनाम केलं जातंय. आज परळीची अशी बदनामी होत आहे, त्यामुळे वाईट वाटतंय. आरोपात कोणतंही तथ्य नाही, असं देखील अजय मुंडे यांनी स्पष्ट केलंय. सुरेश धस आरोप करून पळून जातात, अशी टीका देखील त्यांनी केलीय. माझ्या कुटुंबावर चुकीच्या पद्धतीने आरोप होत आहे. माझ्या मनाला पटलं नाही, त्यामुळे मी आपल्यासमोर आज आलोय.

# बीडनंतर लातूर हादरलं!

## नग्न करून तरुणाला बेदम मारहाण, डोक्यात दगडं घातली



**लातूर । प्रतिनिधी**

बीडनंतर आता लातूरमध्येही तरुणाला बेदम मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. लातूरच्या रस्त्यावर एका तरुणाला ५-७ जणांकडून बेदम मारहाण करण्यात आली आहे. राजश्री बार आणि क्लबमध्ये काही तरुणांमध्ये वाद झाला, या वादानंतर तरुणाच्या डोक्यात दगड घालून तसंच तरुणाचे कपडे काढून

▶▶ उर्वरित पान २ वर

# धक्कादायक! बीड पुन्हा हादरलं

## मुलीचे अश्लील फोटो काढून ब्लॅकमेल करत नराधमानं...

**बीड । प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून राज्यातील गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. बीड जिल्ह्यातील पाटोदा येथे महिला दिनी पोलिस कर्मचाऱ्याने एका महिलेवर लेगिक अत्याचार केल्याची घटना ताजी असताना पुन्हा एकदा धक्कादायक घटना घडली आहे. एका शाळकरी मुलीचे अश्लील फोटो काढून तिला ब्लॅकमेल करत तिच्यावर लेगिक अत्याचार करण्यात आला आहे. याप्रकरणी परळी येथील संभाजीनगर पोलिस स्टेशनमध्ये पोस्को कायद्यांतर्गत (लेगिक



गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षण (POCSO) कायदा २०१२- POCSO ACT) गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

काय आहे हे प्रकरण?

धीरज रामकिशन कांदे असे आरोपीचे नाव असून त्याच्या विरोधात परळी येथील संभाजीनगर पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नराधमान अल्पवयीन मुलीला प्रेमाच्या जाळ्यात अडकलं. मुलीला लग्नाचं आमिष दाखवून तिच्यावर बलात्कार केला असे फिर्यादीत सांगण्यात आले आहे. इतकंच नाही तर नराधमाने पीडित मुलीसोबत अश्लील फोटो काढून तिला ब्लॅकमेल करून तिच्यावर वारंवार लेगिक अत्याचार केला. संभाजीनगर पोलिस पुढील तपास करत आहेत. वर्दीच्या राक्षसाकडून महिला दिनी

▶▶ उर्वरित पान २ वर

# सुपीक 'डोके'चा नायब तहसीलदार असूनही; अपंग सवलतीवर डाका?

**बीड । प्रतिनिधी**

फुकटचं खायचं म्हणलं की कुठल्याही पदावर बसलेली व्यक्ती असो ती काळं बेरं करून कसं शासनाला लुटता येईल एवढ्याच विचार करते. ही बाब नायब तहसीलदाराच्या बाबतीत उघडकिस आली आहे. त्याच्या धडा वर असलेले सुपीक डोकेचालवून त्याने चक्क अपंगांच्या सवलती लाटण्याचा प्रयत्न केल्याचे उघडकिस आले आहे. बीडचे नायब तहसीलदार सुरेंद्र डोके तसे शेजारच्या जिल्ह्यातील असले तरी बीड मध्ये मात्र त्यांनी आपली पाळमूळ खोलवर रुजवली आहेत. दिसायला नेक बंदा, काळबेर करण हाच आपला धंदा हे ब्रीद धरून त्यांनी बीडमध्ये नायब तहसीलदार पदाचा अक्षरशः धंदा बनवला आहे.



आता हेच पहा ना धडधाकट असलेल्या या नायब तहसीलदार पदावर बसलेल्या व्यक्तीने चक्क अपंगत्वाच सर्टिफिकेट मिळवलं. १९ जुलै २०१९ रोजी त्यांनी ऑस्टिओपोरोसिस आणि हाडांच्या समस्यांशी संबंधित पन्नास टक्के आलेलं असल्याचं प्रमाणपत्र मिळवलं. विशेष म्हणजे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी देखील ते दिलं. त्यांनी मिळवलेल्या

▶▶ उर्वरित पान २ वर

# छत्रपती संभाजी महाराजांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विधानभवनात अभिवादन

**मुंबई । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजी महाराज बलिदान दिनानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानभवनात छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन केले. यावेळी विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभेचे अध्यक्ष ड.राहुल नार्वेकर, उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील, कृषी मंत्री माणिकराव कोकाटे, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, पणन मंत्री जयकुमार रावल, राज्यमंत्री पंकज भोयर, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, राज्यमंत्री योगेश कदम, विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्यासह विधीमंडळ सदस्य, वरिष्ठ अधिकारी यांनीही छत्रपती संभाजी



महाराज यांच्या प्रतिमेला पुष्प वाहून अभिवादन केले.

# वस्तीगृहात मुलींची छेड काढणाऱ्या मद्यधुंद तरुणाला विद्यार्थिनींनी दिला चोप

## घटना सीसीटीव्हीत कैद, आरोपी पोलिसांच्या ताब्यात

**जालना । प्रतिनिधी**

जालन्यातील परतूर येथील कस्तुरबा गांधी बालिका वस्तीगृहात मुलींची छेड काढणाऱ्या मद्यधुंद तरुणाला विद्यार्थिनींनी आणि सुरक्षारक्षकाने चांगलाच चोप



दिला आहे. सीसीटीव्हीत कैद झालेल्या या घटनेत संशयित आरोपीने संरक्षण भिंतीवर चढून वस्तीगृहात प्रवेश केला होता. यावेळी आरोपीने विद्यार्थिनींची छेड काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, विद्यार्थिनींनी धाडस दाखवत त्याला


▶▶ उर्वरित पान २ वर




# मुंडे, धस, क्षीरसागर यांच्यानंतर सोळंकेही अडचणीत

**बीड । प्रतिनिधी**

निकटवर्तियांच्या कारनामाम्यांमुळे बीडमधील लोकप्रतिनिधी अडचणीत येत असल्याच्या घटना वारंवार समोर येत आहेत. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणामुळे धनंजय मुंडे अडचणीत सापडले आहेत. त्यांच्यापाठोपाठ आमदार सुरेश धस आणि आमदार संदीप क्षीरसागर यांच्या निकटवर्तीयांचे कारनामे समोर आलेत. त्यामुळे



हे दोन्ही नेते अडचणीत आहेत. अशामध्ये आता आमदार प्रकाश सोळंके यांच्या निकटवर्तीयाचा कारनामा समोर आला आहे. प्रकाश सोळंके यांचा निकटवर्तीय एका व्यक्तीला बेदम मारहाण करतानाचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे.

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मीक कराडमुळे आमदार धनंजय मुंडे अडचणीत सापडले आहेत. त्यांच्यानंतर बीड जिल्ह्यातून अनेक लोकप्रतिनिधींच्या निकटवर्तीयांचे कारनामे समोर येत आहेत. आमदार सुरेश धस हे त्यांचा निकटवर्तीय सतीश भोसले उर्फ खोक्यामुळे अडचणीत आले आहेत. त्यानंतर संदीप क्षीरसागर यांच्या पीएचा मारहाणीचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर ते चर्चेत आले. त्यानंतर आता माजलगाव मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके यांच्या निकटवर्तीयाचा देखील एक धक्कादायक कारनामा समोर आला आहे. आमदार प्रकाश सोळंके यांचा निकटवर्तीय सुशील सोळंके आणि त्याची पत्नीने एका मल्टी सर्विसेस सेंटरच्या चालकाला बेदम मारहाण केली आहे. ही घटना जुनी असली तरी सध्या त्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे. तसेच या प्रकरणात गुन्हा दाखल होऊन ही अद्याप सुशील

▶▶ उर्वरित पान २ वर

# शेतकऱ्यांना भोगवटा वर्ग 2 जमिनींवर कर्ज मिळण्यासंबंधीचे परिपत्रक पुन्हा निर्गमित करणार- महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**मुंबई । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांना विविध कामांसाठी देण्यात येणाऱ्या कर्जावर तारण म्हणून भोगावटा वर्ग दोनमधील जमीनी बँका, वित्तीय संस्थांकडे तारण ठेवण्यासंदर्भातील परिपत्रक यापूर्वीच निर्गमित करण्यात आले आहे. यासंबंधी वित्तीय संस्थांना माहिती व्हावी व शेतकऱ्यांना कर्ज मिळण्यास सुलभता यावी यासाठी हे परिपत्रक पुन्हा निर्गमित करण्यात येणार आहे. तसेच याची माहिती सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधितांना द्यावी, असे निर्देश



महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. देवस्थान इनाम वर्ग ३ (दुमाला), भोगवटा वर्ग २, रेघेखालील कुळ, प्रकल्पाकरिता राखीव इ. धारण प्रकार असणाऱ्या शेतजमिनीवर अल्प मध्यम व दीर्घ मुदत तसेच व्यावसायिक कर्ज वाटप करण्यासंदर्भात येणाऱ्या अडचणीबाबत महसूल मंत्री श्री. बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. यावेळी सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्व. उपक्रम वगळून) शिवेंद्रसिंह राजे भोसले, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील, अपर जिल्हाधिकारी राजेंद्र मुठे, आदी यावेळी उपस्थित होते.

# बंजारा समाज आणि होळी... जय सेवालाल!!

बंजारा समाजात होळीचा सण अगदी दिवाळीसारखाच साजरा होतो, लोकगीतं हे बंजारा समाजाच्या लोकसंस्कृतीचे खास आकर्षण आहे . खरं तर होळीच्या आधी येणाऱ्या दांडी पौर्णिमेपासून त्यांच्या होळीला सुरुवात होते. या गीतांना 'लेंगी गीत' असेही म्हटले जाते. बंजारा समाजाच्या होळीत 'पाल', 'गेर', 'फगवा', 'धुंड' अशा अनेक परंपरा जोपासल्या जातात.

भारतीय सनातन संस्कृती विविध सण उत्सवांनी नटलेली आसून समाजात एकोपा रहावा तसेच समाज संघटित, सुरक्षित व समरस रहावा यासाठी सण उत्सवांचे अनन्य साधारण महत्व आहे. 'होळी' हा सण पूर्ण भारतात विविध प्रकारे साजरी केला जातो. बंजारा समाजातील होळी सण तर फारच उल्लेखनीय असतो.

बंजारा समाजात दोन सण प्रामुख्याने साजरी केले जातात एक होळी आणि एक दिवाळी. बंजारा समाजाचा पारंपारिक आणि अति विशेष सण म्हणजे होळी आहे. बंजारा समाजाच्या आकर्षक संस्कृतीचे दर्शन होळी मधून दिसते. बंजारा समाजात दांडी पौर्णिमेपासून होळीला सुरवात होत असते म्हणजे एक महिना आधीपासून. या होळी उत्सवात अगदी लहानांपासून तर वृद्धांपर्यंत सर्वचजण सहभागी होतात. निसर्गाला अनुसरून होळी उत्सव साजरा केला जातो. बंजारा समाजात नृत्याचे विविध प्रकार आहेत राधा नृत्य, लडी







नृत्य, उपरेरो नृत्य, पीर नृत्य, लंगडी पाय नृत्य. सर्व नृत्य होळी साजरी करत असताना सादर केले जातात. बंजारा समाजाचा इतिहास हा मौखिक असल्यामुळे लोकगीतांच्या माध्यमातून इतिहास समजतो. लोकगीतांना बंजारा समाजात अनन्यसाधारण महत्त्व आहे. नृत्य आणि लोकगीतांशिवाय बंजारा समाजाची होळी होऊच शकत नाही. होळी उत्सव पारंपरिक नृत्य, लोकगीते हे बंजारा समाजाचे अविभाज्य घटक आहेत.

सामान्यतः अन्य ठिकाणी पौर्णिमेच्या दिवशी होलिका पेटवून होळी साजरी केली जाते. परंतु, बंजारा समाजात दुसऱ्या दिवशी म्हणजेच धुलीवंदनाच्या दिवशी पहाटेच्या अंधारात होळी पेटवली जाते. परंपरेनुसार तांडासमोर पूर्व दिशेला होलिकेस पेटवल्यानंतर महिला व पुरुष निघून जातात, पण युवक युवती होलिकाजवळ गाणी गातात आणि नाचतात. होळी खेळणा–या युवकाला 'गेरीया' तर युवतीला 'गेरळी' असे म्हटले जाते. मौजमजेसाठी महिला मोठ्या, मोठ्या काठ्या घेवून पुरुषांवर प्रहार करतात. विशेषकरून वहिनी–दिरावर काठ्यांचा प्रहार करते. बंजारा समाजात केसुलाला(पळस) विशेष महत्त्व आहे. तांड्यावर केसुलाला पाण्यात टाकून ओला रंग केला जातो व तो मोठ्याप्रमाणात वापरला जातो.

ज्यांच्या घरात होळीच्या आधी किंवा नंतर मुलगा जन्माला आला आहे त्याचा जन्मदिवस होळीच्या दिवशी साजरी केला जातो त्याला 'धुंड' असे म्हणतात. ज्यांच्या घरात लहान मूल जन्माला आलं आहे त्याचा शोध घेतल्या जातो व त्यांच्या अंगणात 'धुंड' केला जातो. धुंड करत असताना त्या तांड्यातील सर्वजण नंगारा,हलगी,डफडा वाद्य वाजवत लेंगी गातात व नृत्य करतात. 'धुंड' च्या ठिकाणी खीर एका हंड्यात टाकली जाती, तो हंडा एका खड्यात टाकल्या जातो, मग नंतर तो हंडा काढण्यासाठी पुरुष प्रयत्न करतात तेव्हा महिला त्यांच्यावर लाठीमार करतात, कितीही लाठीमार झाला तरी शेवटी त्या व्यक्तीला हंडा पळवून न्यायचा असतो.

बंजारा समाजाच्या होळी मध्ये कोणत्याही प्रकारचा भेद नसतो, तांड्यातील प्रत्येकजण होळी उत्सव साजरा करण्यासाठी घराबाहेर एकत्र येतात. होळी सण साजरी करतांना बंजारा समाजातील सर्वसमावेशकता, संघटीतपणा, एकात्मता, बंधुभाव सहजपणे दिसून येतात. हजारो वर्षापासून देश व समाज रक्षणासाठी बंजारा समाज विविध प्रांतात भटकंती करत राहिला, तरीही आपली सनातन संस्कृती या समाजाने कायम जपून ठेवली आहे.

– शब्दांकन , विशाल पवार(सहशिक्षक ), गोर धर्म प्रचारक, देगलूर

पान ४ वरून पुढे...

## बीडनंतर लातूर...

अमानुष मारहाण करण्यात आली. या हल्ल्यात तरुणाची प्रकृती गंभीर असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. तसंच पोलीस फरार आरोपींचा शोध घेत आहेत. आरोपींना पकडण्यासाठी पोलिसांची पथकं रवाना झाली आहेत. मराठवाड्यातील बीड पाठोपाठ आता तातूरमध्येही भरदिवसा मुख्य रस्त्यावर तरुणाला अमानुषपणे मारहाण करण्यात आली. लातूर शहरातील अंबाजोगाई रोड परिसरात असलेल्या एका बारच्या पुढे हा थरार सुरू होता. याच ठिकाणी असलेल्या राजश्री बार आणि क्लबमध्ये काही तरुणांचा वाद झाला. बारमध्ये हाणामारी झाल्यानंतर हा वाद रस्त्यावर आला. रस्त्यावर ५–७ जणांनी मिळून एका तरुणाला नग्न करून मारहाण केली. तसंच त्याच्या डोक्यात, अंगावर दगडंही मारण्यात आली. या अमानुष मारहाणीचा व्हिडिओही समोर आता आहे. याप्रकरणी लातूरच्या शिवाजीनगर पोलिसांनी जखमी तरुणाला लातूरच्या विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात दाखल केलं आहे. तरुणाची प्रकृती सध्या चिंताजनक आहे.

## धक्कादायक!...

महिलेवर अत्याचार– बीड जिल्ह्यातील पाटोदा पोलिस स्टेशनचे अंमलदार उद्धव गडकर असे आरोपीचे नाव आहे. आरोपीने पीडित महिलेशी काही कामानिमित्त ओळख झाली होती. हे दोघे एकमेकांच्या संपर्कात होते. यानंतर आरोपी पोलिसाने महिला दिनानिमित्त एका कार्यक्रमासाठी एका महिलेला बोलवले होते. ही महिला कार्यक्रमाच्या ठिकाणी पोहोचल्यावर गडकर यांनी पाटोदा येथील बँकेच्या बाजूला असलेल्या घरात नेऊन त्या महिलेवर बलात्कार केल्याचे समजते.

तुला खोट्या गुन्ह्यात अडकवेल– बलात्काराच्या घटनेवेळी पीडित महिलेने आरडाओरडा केली. मात्र, नराधमाने पीडितेला धमकी दिली. तुला खोट्या गुन्ह्यात अडकवेत, असे बजावले. मात्र, पीडित महिलेने पाटोदा पोलिस स्टेशन गाठत आरोपीविरुद्ध तक्रार दाखल केली. या घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिस उपअधीक्षक बाळकृष्ण हुनगुडे यांनी अंमलदार उद्धव गडकर या पोलीस कर्मचाऱ्याच्या विरोधात गुन्हा क्र ७७/२५ भा. द. वी ६४/२ –(१) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे.

## सुपीक 'डोके'चा...

प्रमाणपत्राचा क्रमांक: MH 3130920000031944 हा आहे.तर नोंदणी क्रमांक 5731/00001/2192/624543 आहे.

वास्तविक पाहता ५०% व्यंग या व्यक्तीत कुठे हि आढळत नाही. मग वैद्यकीय अधिकाऱ्यांनी प्रमाणपत्र कसं दिलं हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. हे प्रमाणपत्र सत्य आहे की असत्य याची पडताळणी होणं गरजेचं आहे. हे प्रमाणपत्र बनावट असेल तर नायब तहसीलदार सुरेंद्र डोके वर गुन्हा दाखल होणे गरजेचे आहे. याबरोबरच या प्रमाणपत्राचा वापर करून अपंगांच्या सवलती पदोन्नतीसाठी मिळवल्या की आणखी दुसऱ्या काही सवलती मिळवल्या याची चौकशी होण देखील गरजेचे आहे. नायब तहसीलदार सारख्या जबाबदार पदावरील व्यक्ती भरमसाठ पगार असूनही जर असे अपंगाच्या सवलतीवर दरोडा टाकीत असेल तर गोरगरीब अपंगांनी जगायचं कसं? अपंगांचे अधिकार अशी माणसं लुबाडत असतील तर अशा व्यक्तीवर कठोर कारवाई व्हावी अशी मागणी होऊ लागली आहे. या प्रकरणात पुन्हा एकदा त्यांची वैद्यकीय चाचणी करण्यात यावी ते खरंच सवलतींच्या नियमात बसतात का? याची पडताळणी करावी. सवलतीत बसत नसतील तर त्यांच्यावर गुन्हा दाखल करून घरचा रस्ता दाखवण्यात यावा. पदावरून हाकलून देत त्यांनी जो जो लाभ घेतला आहे त्याची भरपाई त्यांच्याकडून करून घ्यावी अशी मागणी देखील जोर धरू लागली आहे.

## वस्तीगृहात मुलींची छेड....

चांगला चोप देत पोलिसांच्या स्वाधीन केलं आहे.

या घटनेनंतर परतूर येथील कस्तुरबा गांधी बालिका वस्तीगृहातील सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. त्यामुळे परतूर तहसीलदारांनी वस्तीगृहात भेट देऊन सुरक्षेचा आढावा घेतला आहे. दरम्यान, एक मद्यधुंद तरुण वसतीगृहात नेमका आला कसा? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. या घटनेमुळं वसतीगृहातील मुलींच्या सुरक्षेसंदर्भात प्रश्न उपस्थित केले जात आहेत. दरम्यान, य मद्यधुद अवस्थेत आलेल्या तरुणाला विद्यार्थीनींनीं चांगलाच मार दिल्याचं पाहायला मिळालं.

## मुंडे, धस, क्षीरसागर...

सोळंकेला अटक झालेली नाही. तर उच्च न्यायालयाने त्याचा जामीन अर्ज फेटाळला आहे. सुशील सोळंके माजलगावमध्ये असताना देखील पोलिस त्याला अटक का करत नाही? असा सवाल उपस्थित केला जात आहे. दरम्यान या व्हिडीओमुळे आमदार प्रकाश सोळंके यांच्या अडचणीत देखील वाढ होण्याची शक्यता आहे. दरम्यान, आमदार सतीश धस यांचा कार्यकर्ता सतीश भोसले उर्फ खोक्याने पितापुत्राला अमानुष माराहाण केली होती. या मारहाणीचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर तो चर्चेत आला. त्यानंतर त्याचे दहशत माजवणारे अनेक व्हिडीओ समोर येत आहे. या प्रकरणी त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पण पोलिसांनी अद्याप त्याला अटक केली नाही. सतीश भोसले सध्या फरार असून पोलिस त्याचा शोध घेत आहेत. खोक्याच्या या प्रकरणामुळे सुरेश धस अडचणीत आहेत. पण या प्रकरणात सतीश भोसले दोषी असेल तर त्याच्याविरोधात कारवाई करण्यात यावी अशी मागणी सुरेश धस यांनी केली आहे.

पान ४ वरून पुढे...

## महिलांनी शिक्षणाबरोबर...

गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव,तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे, एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी ज्योती बेल्हेकर, केंद्रीय फिल्म सल्लागार समिती मंडळ सदस्य डॉ स्मिता बारवकर,सरपंच शालिनी मुळे, महावितरण कंपनीच्या सहाय्यक अभियंता कोमल शिंदे, डॉ प्रियांका सिंघण, जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्ष सुवर्णा गि–हे, सरपंच प्रतिभा थोरवे आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना प्राजक्ताताई धस म्हणाल्या की, युवा पत्रकार संघ नेहमी सामाजिक कार्यात अग्रेसर असून त्यांनी तळागाळातील महिलांचा सन्मान करून एक स्तूत्य उपक्रम राबवत आहेत.कोणीही अन्याया विरुध्द लढत असताना त्यांना अनेक प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागते. मग ती छोट्या घरातील महिला असो किंवा माझ्यासारखी राजकिय घराण्यातील असो जेव्हा माझ्यावर ट्रॉसिटीचा खोटा गुन्हा दाखल करून मला त्यामध्ये गोव्यण्याचा प्रयत्न करण्यात आला होता ज्यांनी मला त्रास दिला त्या विरुध्द मी एक महिला असूनही माझ्यावर झालेल्या अन्याया विरोधात मी ताकतीने आवाज उठविला आणि मला न्यायदेवताने न्याय दिला आणि मला त्रास देणाऱ्याची आज काय अवस्था झाली आहे हे सर्व बीड जिल्ह्यातील जनता उघड्या डोळ्यांनी पाहत आहे त्याची फेड त्याला लगेच मिळाल्याचे त्यांनी बोलताना मनातील भावना व्यक्त करून सांगितल्या. यावेळी बोलताना उपविभागीय अधिकारी वसीमा शेख म्हणाल्या की, जागतिक महिला दिनाच्या कार्यक्रमाला छेद देणारा आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचा स्तुत्य उपक्रम आज महिलांनी विविध क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे.अशा कर्तबगार महिलांचा जागतिक महिला दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते परंतु आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचा जागतिक महिला दिनानिमित्ताचा महिला पत्रकार नसताना ही पुरूष पत्रकार बांधवांनी सर्व कार्यक्रमाला छेद देणारा कार्यक्रम घेतला आणि मागिल अनेक वर्षांपासून पुरुषांनी महिलांचा सन्मान करण्याचा उपक्रम मी पहिल्यांदाच पाहत आहे.आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे करावे तेवढे कौतुक कमीच आहे. तसेच विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विविध क्षेत्रातील महिलांना पुरस्कार देऊन सन्मान केला. महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे महिला अत्यंत धाडसी कामे करतात.पुरूषाच्या बरोबरीने आज महिला काम करत आहेत. तळागाळातील उत्कृष्ट कार्य करत आहेत. अशा महिलांमुळे समाजातील महिला मुलींना प्रेरणा मिळत राहते असे त्यांनी मत व्यक्त केले. यावेळी गटविकास अधिकारी गोकुळ बागलाणे, एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी ज्योती बेल्हेकर,गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे, जिजाऊ ब्रिगेडच्या अहिल्या नगरच्या जिल्हाध्यक्षा ड स्वाती जाधव,ग्राम महसूल अधिकारी अंकीता जाधव यांनी आपले विचार मांडले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, सचिव जावेद पठाण, निसार शेख,अक्षय विधाते,समीर शेख, गहिनीनाथ पाचबैल, संतोष नागरगोजे, मारूती संत्रे,अतुल जवणे, प्रेम पवळ, संतोष तांगडे, सोपान पगारे, आदिनाथ ठोंबरे,संतोष दाणी, राजेंद्र लाड, सिताराम पोकळे,विठ्ठल राख, सचिन पवार, शिक्षक अनिल बेदरे,किरण शिनगिरे, विजय राजपुरे, ओंकार कदम, संस्कार लाड,आदींनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक समीर शेख यांनी केले तर या कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचलन राजेंद्र लाड यांनी केले व आभार अविनाश कदम यांनी मानले.

## नियमबाह्य मुद्राक....

आर्थिक फटका सहन करावा लागतोय. याबाबत ओरड होतच दुय्यम निबंधक कार्यालय श्रेणी एक कडून मुद्रांक विक्रेत्यांना नोटीस काढून नियमबाह्य पद्धतीने मुद्रांक विक्री करणाराची तक्रार आल्यास चौकशी करून चौकशीमध्ये दोषी आढळणाऱ्या वर कायदेशीर कारवाई करत मुद्रांक परवाना रद्द करण्यात येणार असल्याची नोटीस कार्यालयाने शहरातील मुद्रांक विक्रेत्यांना काढली आहे. तसेच शहरात अनेक मुद्रांक विक्रेते त्यांना नेमून दिलेल्या जागेवर मुद्रांक विक्री न करता सोयीच्या ठिकाणी बसून मुद्रांक विक्री करत असल्याबाबतही दुय्यम निबंधक कार्यालयाकडे विचारणा केल्यानंतर त्यांनी पुढील दोन दिवसात सर्व माहिती घेऊन उत्तर देणार असल्याचे सांगितले. मुद्रांक विक्रेत्यांनी कोर्ट फी, न्यायालयीन तिकिटाचा उपलब्ध साठा ठेवणे तसेच मुद्रांक विक्री करत असताना सर्व नियम आणि अटीचे पालन करणे बंधनकारक आहे. नागरिकांकडून तक्रार आल्यास तक्रारी त्यानंतर झालेल्या चौकशीतून मुद्रांक विक्रेता दोषी आढळून आल्यानंतर त्याचा परवाना रद्द केला जाईल असे दुय्यम निबंधक बी.डी. गोरे यांनी सांगितले.

## पक्षांसह वृक्ष....

पिव्यासाठी झाडांवर विविध प्रकारचे पक्षी दिसुन येत आहेत. तसेच पक्षी संवर्धनाबरोबरच नविन लावलेल्या वृक्षांचे संवर्धन करण्यासाठी टाकावू पाणी बॉटलच्या सहाय्याने झाडांना ठिबक सिंचन करून पाणी दिले जात आहे. झाडांच्या खोडालगत पाण्याने भरलेल्या बॉटल ठेवल्यामुळे त्यामधुन सतत पाणी टिपकत राहील अशी व्यवस्था केल्यामुळे झाडाच्या खोलवर ओलावा होत आहे. झाडांना पाणी व पक्षांसाठी बांधण्यात आलेल्या कुंड्यात पाणी टाकण्यासाठी येथील विद्यार्थी मेहनत घेताना दिसतात. यामुळे भर उन्हाळ्यात देखील झाडे टवटवित दिसु लागली आहेत. या अनोख्या उपक्रमासाठी विद्यार्थ्यांना या विद्यालयाचे कला शिक्षक किशोर निकम सर यांचे मार्गदर्शन लाभत आहे. तसेच या उपक्रमाचे विद्यालयाचे मुख्याध्यापक रमेश बागलाने यांच्यासह सर्व शिक्षक वृंद व ग्रामस्थांनी कौतूक केले आहे.

## प पु माधवानंद महाराज...

कार्यक्रमाचे आयोजन केले होते,प पु माधवानंद महाराज यांच्या शुभहस्ते कलशारोहन करून महाप्रसादाचे आयोजन देखील करण्यात आले,प्रसिद्ध कंत्राटदार अतुल संघांनी यांनी महाप्रसाद ठेवला होता तर या कार्यक्रमाचे पौरोहित्य संतोष रत्नपारखी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केले,सतीश कुलकर्णी, विलासराव रत्नपारखी, योगेश विलास खडके,गोपाळ पाठक या यजमानाच्या हस्ते विधिवत पूजन करण्यात आले यावेळी भाविकांना बसण्यासाठी फेव्हरब्लॉक बसवण्याचे काम करण्याचा संकल्प करण्यात आला तेव्हा शहरातील प्रसिद्ध व्यापारी सत्यनारायण लाहोटी यांनी लगेच ५ ब्रास तर जयंत पत्की यांनी २ ब्रास फेव्हरब्लॉक दिले त्याचेही काम पूर्ण करण्यात आले असून भाविकांच्या सोयी सुविधांसाठी मंदिराचे प्रमुख भाविक प्रयत्न करत आहेत,कमी कालावधीत प्रसिद्ध झालेल्या या मंदिरात दिवसेंदिवस भाविकांची गर्दी वाढत असून दर गुरुवारी आणि पौर्णिमेला सकाळी अभिषेक आरती आणि सांयकाळी ७ वाजता सामुदायिक आरतीची परंपरा येथे सुरू करण्यात आली आहे,विशेष म्हणजे सांयकाळी आरती नंतर खिचडी हा प्रसाद देखील याठिकाणी सुरू केला आहे

## विकासकामे दर्जेदार...

सूत्रसंचालन शिवराज जाधव यांनी केले तर आभार ग्रामपंचायत सदस्य तुकाराम जाधव यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सरपंच एकनाथ बनसोडे, उपसरपंच राहुल जाधव, ग्रामपंचायत सदस्य अशोक जाधव, संदीप जाधव, तुकाराम जाधव, ब्रह्मनाथ जाधव, बाळू जाधव यांनी परिश्रम घेतले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वित्त व नियोजन मंत्री...

असणारे राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री अजितदादा पवार हे बीड जिल्ह्याचे पालकमंत्री असुनही आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीय शासकीय मदतीपासून वंचित असणे हि अशोभनीय बाब आहे . यासाठी आवश्यक १ कोटी ३२ लाख रुपयांच्या निधीची मागणी जिल्हा प्रशासनाने करून दीड महिना उलटुनही अद्याप निधी मिळाला नाही.बीडच्या विकासाचे व्हिजन दाखवणा–या अजितदादांनी विकासाचे गाजर बीडकरांच्या हाती दिल्याची जनमाणसात भावना असुन तातडीने मदतनिधी द्यावा. केंद्र सरकारने हर घर जल देण्यासाठी जलजीवन मिशन योजनेअंतर्गत प्रतिव्यक्ती ५५ लिटर पाणी देण्याची योजना कार्यरत केली असुन बीड जिल्ह्यात १२२३ गाव आणि वाड्यांची संख्या आहे. पाणीपुरवठा योजना राबविण्यासाठी ११८४ जुन्या आणि आता नव्याने ८१ अशी एकूण १२६५ पाणीपुरवठा कामांना मंजुरी देण्यात आलेली आहे. यात ० ते २५ टक्के कामे झालेली ८६ तर २५ ते ५० टक्के कामे झालेली १८० तर ५० ते ७५ टक्के कामी झालेली ३८७ कामे तर ७५ ते ९९ टक्के कामे पूर्ण झालेली ३२७ कामे आहेत. यात २४६ कामे पुर्णत्वाकडे असून ३३ योजना ग्रामपंचायतीकडे वर्ग केलेल्या आहेत. मागील ८ महिन्यापासून जलजीवन मिशन साठी निधीचा तुटवडा निर्माण झाला आहे. जिल्हा प्रशासनाने २५० कोटी रुपये निधीची मागणी शासनाकडे केलेली आहे. मात्र केवळ १४ कोटी रुपये निधी शासनाने उपलब्ध करून दिलेला आहे. त्यामुळे पालकमंत्री बीड य अजित दादा पवार यांनी तातडीने निधी उपलब्ध करून द्यावा.अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

## श्रीसर्वतीर्थ सेवा ....

लिंबागणेश येथील श्रीकृष्ण मंदिरात चक्रधर स्वामी मंदिरात महानुभव भक्तांच्या वतीने बाबांचे शाल श्रीफळ आणि पुष्पहार करून स्वागत करण्यात आले.श्रीकृष्ण मंदिरात विडा, आवसर, देवाला आरती करून महंत कानळसकर यांचे सुश्राव्य प्रवचन झाले. चक्रधर स्वामींच्या पदस्पर्शाने पावन स्थांनांची महती सविस्तर विशद करून सांगितली. दुपारी देवाला उपहार करून भोजन करण्यात आले.भोजनाची व्यवस्था श्रीकृष्ण मंदिर देवस्थान व गावातील महानुभव भक्तांच्या वतीने करण्यात आली होती. यावेळी बाळुकाका पाटोदकर, राजाभाऊ गिरे, अर्जुन गिरे,अनंतकाका मुळे, भालचंद्र गिरे,गोवर्धन गिरे, सुदाम मुळे, तुळशीराम वनवे,किसन आबदार , ज्योती पाटोदकर आशाबाई गिरे,सिंधुबाई गिरे, ज्योती गिरे,उषाबाई मुळे व भाविक उपस्थित होते. दुपारचे भोजण आणि विश्रांती नंतर पदयात्रा पोहिचा देव कडे मार्गस्थ झाली.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com





*मसाजोग ते बीड ही सद्भावना पदयात्रा मांजरसुंबा येथे आल्यानंतर येथील ग्रामस्थांनी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन दादा सपकाळ यांचे गौतमबुद्ध व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा देऊन स्वागत करतांना प्रा. शामसुंदर जाधव, संदीप इंगोले, मनोज कोरडे, विशाल इंगोले, शेख चाँद, अभिजीत गायकवाड, अजित भोले ॲड. गणेश करांडे ॲड. विद्याताई गायकवाड, डॉ. जयप्रकाश आघाव, प्रा.प्रशांत पवार रमेश सानप इत्यादी...*

## सादोळा शाळेमध्ये माता पालकांचा सन्मान सोहळा संपन्न



**माजलगाव । प्रतिनिधी**

येथून जवळच असलेल्या जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सा दोळा येथे माता पालकांचा सन्मान सोहळा पार पडला. दिनांक ८ मार्च रोजी आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त गावातील सर्व माता पालक तसेच अंगणवाडी ताई, शाळेतील शिक्षिका यांचा सादोळा येथील जिल्हा परिषद शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी डॉक्टर घुमरे ,गोविंद गोचडेश्रीमती गवळी श्रीमती काळे या ग्रामीण रुग्णालयातील अधिकाऱ्यासह पंचकोशीतील आशाताई व अंगणवाडी सेविका यांचा अनिता लांडगे सविता पिल्लेवाड राजश्री गोरे यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला.

महिलांचा सन्मान फक्त एका दिवशी न करता तो नेहमीच सर्वांनी केला पाहिजे अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आले .व स्त्रियांच्या कार्यप्रणालीचे कौतुक करण्यात आले

यावेळी काही मान्यवरांची मार्गदर्शनपर भाषणे झाली. निपुण महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत माता पालक यांना प्रमाणपत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.या कार्यक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक नवनाथ शिनगारे राधाकृष्ण मुंडे सांस्कृतिक विभाग प्रमुख पुरुषोत्तम काठुळे, तेजस कुमार बनसोडे यांनी परिश्रम घेतले

## मठाधिपती ह.भ.प.लक्ष्मण महाराज मेंगडे सह समाज प्रबोधनकार नाना महाराज कदम यांची साक्षीताई करडकर यांच्या भागवत कथेला सदिच्छा भेट

**बीड । प्रतिनिधी**



श्री गुरु बंकट स्वामी महाराज संस्थान चे मठाधिप ह भ प लक्ष्मण महाराज मेंगडे यांनी खर्डेवाडी येथे चालू असलेल्या साक्षीताई कराडकर यांच्या भागवत कथेला सदिच्छा भेट दिली महाराजां समवेत समाज प्रबोधनकार ह भ प नाना महाराज कदम तसेच भागवताचार्य दिनेशानंद शास्त्री महाराज हे देखील उपस्थित होते. बाबांनी कथामंडपामध्ये आपले शिश्या साक्षीताई करडकर यांची भागवत कथा श्रवण केली . आपल्या संस्थेच्या विद्यार्थिनीचे कौतुक करून आशीर्वाद दिले .यावेळी कथा सभामंडपामध्ये हभप मेंगडे महाराज यांचा कळेकर परिवाराकडून शाल श्रीफळ पुष्पहार देऊन सन्मान करण्यात आला. बंकट स्वामी महाराज यांच्या सानिध्यात आले की आपल्या जीवनाच सोने होत .प्रत्येकाला आपला योग्य मार्ग सापडतो अशा शब्दात मेंगडे महाराजांनी साक्षीताईचे कौतुक केले .यावेळी श्रीमद् भागवत कथा श्रवण करण्यासाठी बीड व पंचक्रोशीतील भाविक भक्तांची मोठी उपस्थिती होती



*माजलगाव तालुक्यातील सुलतानपूर येथील शेतकरी सौ वर्षा अशोक नरवडे यांनी पुरुषोत्तमपुरी ३३ के.व्ही. उपकेंद्रासाठी ६० आर बागायती जमिन दान दिल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना शिवाजी वाडेकर कार्यकारी अभियंता स्थापत्य विभाग बीड, उपकार्यकारी अभियंता मन्मथ स्वामी साहेब विजयकुमार गायके, सब रजिस्टर बि.डी.दारेवार कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जयदत्त (अण्णा) नरवडे उपसभापती श्रीहरी (नाना) मोरे.*

## प.पु.जयशेखर मुनी यांच्या सानिध्यात 'जैन होळी चातुर्मास'

**माजलगाव । प्रतिनिधी**



दरवर्षी प्रमाणे याही वर्षी माजलगावात जैन परंपरेने होणारा होळी चातुर्मास दि.१३ मार्च २०२५ रोजी येथील श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ यांच्या वतीने येथील राजस्थानी मंगल कार्यालयामध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांसह होळी चातुर्मास संपन्न होईल. यावर्षी या होळी चातुर्मासाच्या निमित्ताने जैन मुनी आचार्य प्रवर पार्श्वचंद्र म.सा. चे आज्ञाधारक, प्रवचन प्रभावक मुनी डॉ.पद्मचंद्र म.सा. यांचे सुशिष्य सेवाभावी साधू जयशेखर मुनी म.सा. व मधुर व्याख्याता डॉ.जयघोष मुनी म.सा. आदी ठाणा २ यांच्या पावन सानिध्यात गुरुवार दि.१३ मार्च २०२५ रोजी सकाळी ८.३० ते १०.०० वाजेपर्यंत धार्मिक जाप व तसेच सकाळी १०.०० ते ११.०० ज्ञानाच्या अमृत वाणीने मधुर असे प्रवचन होणार असून सर्वधर्मीय भाविक-भक्तांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा व प्रवचन वेळी भरपूर संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ माजलगाव यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय येथे माता पालक सोहळा संपन्न



**वडवणी । प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनानिमित्त शाळेच्या वतीने माता-पालक सन्मान सोहळा घेण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या गीत सादर केले.आणि भाषणं दिले.माता पालक येनुबाई भोरे यांनी यावेळी माता सावित्री व माता रमाई यांच्यावर सुंदर गीत गायले.कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार गितांजली लव्हाळे, शाळेच्या मुख्याध्यापिका शिंदे मॅडम यांनी अध्यक्ष स्थान , तसेच लोकमान्य टिळक महाविद्यालयाचे प्राध्यापक , खेत्री सर, प्राध्यापक, घाईतीडक सर, कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते. यावेळी भाषणात बोलताना खेत्री सर म्हणाले की मुलींनी अभ्यास करून मोठ्या मोठ्या पदावर जायला हवं, आणि स्वतः च्या पायावर उभा राहणं आवश्यक आहे.तसेच प्राध्यापक घाईतीडक सर म्हणाले की... आज आम्ही मोठे झालो ते फक्त आमच्या माता माऊली मुळेच या पदावर आम्ही आहोत.

महिलांचे जीवन हे संघर्षमय असतं कणखर असतं तिने जिद्द पेटली तर ती काही करू शकते .त्याचे उदाहरण पत्रकार गिताजली लव्हाळे मॅडम यांच्या वरून त्यांनी संबोधले.. आणि पत्रकार गितांजली लव्हाळे यांनी मुलींना सांगितले की घाबरायचं नाही.. आपल्यावर अत्याचार होत असेल तर पोलीस स्टेशन आहे .महिला दक्षता कमिटी व विशाखा कमिटी आहे. आमच्या सोबत संपर्क साधून आम्ही तुम्हाला तिथे येऊन संरक्षण करू शकतो.

# माविम सुवर्ण महोत्सवी वर्ष व जागतिक महिला दिनानिमित्त आयोजन

## बचत गटांच्या जिल्हास्तरीय नवं तेजस्विनी प्रदर्शन व विक्री महोत्सवास प्रारंभ

**बीड । प्रतिनिधी**



महिला व बाल विकास विभाग अंतर्गत असणाऱ्या महिला आर्थिक विकास महामंडळाच्या सुवर्ण महोत्सवी वर्धापन दिना सह जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित नवतेजस्विनी जिल्हास्तरीय प्रदर्शन व विक्री महोत्सवाला आज प्रारंभ झाला.

तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण उद्योग ऊर्जा प्रकल्पाच्या अंतर्गत छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे संयम साहित्य महिला बचत गटाद्वारे उत्पादित वस्तू व मालाचे विक्री आणि प्रदर्शन या ठिकाणी १२ मार्चपर्यंत सुरू राहणार आहे. याचे उद्घाटन अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या हस्ते झाले यावेळी जिल्हा अध्यक्ष कृषी अधिकारी सुभाष साळवे जिल्हा व बाल विकास अधिकारी फारुख शेख तसेच महिला आर्थिक विकास महामंडळाची चे विभागीय सल्लागार संदीप मराठे आदींची प्रमुख उपस्थिती होती. या प्रदर्शनात जिल्ह्यातील विविध उत्पादनांचे ५२ स्टॉल लावण्यात आले आहेत ज्यामध्ये गावरान धान्य कडधान्य स्वादिष्ट मसाले रुचकर पापड कोरडई शेवया लोणची त्यासोबतच गावरान तूप अंडी कापडी पिशव्या कापूस वेचणी कोट रेडिमेड ब्लाऊज इमिटेशन ज्वेलरी आणि इतर खाद्यपदार्थांचे देखील स्टॉल आहेत.

### वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि. बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर श्री. कौस्तुभ नागेश मराठे यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक २०४/२०२५ विनीता व इतर विरूध्द - निरंक**

ज्याअर्थी मयत नामे **संपत लक्ष्मण गायकवाड रा. मौजे मादळमोही ता. गेवराई जि.बीड हे दिनांक २५/०७/२०२१ रोजी मौजे मादळमोही ता. गेवराई जि.बीड** येथे मयत झाले आहेत.

अर्जदार : १. विनीता भ्र. संपत गायकवाड, वय ६० वर्षे, धंदा शेती, रा.संगमजळगांव, ता. गेवराई जि.बीड, २. संतोष पि. संपत गायकवाड, वय ३८ वर्षे, धंदा शेती, रा. मादळमोही ता. गेवराई जि.बीड ह.मु. संगमजळगांव ता. गेवराई जि. बीड, ३. ज्योती भ्र. राजेंद्र निकाळजे, वय ४० वर्षे, धंदा घरकाम, रा.उचेगांव टाकळी, अंबड जि. औरंगाबाद

शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे **संपत लक्ष्मण गायकवाड रा. मौजे मादळमोही ता. गेवराई जि.बीड** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०६/०३/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. पुढील तारीख: २३/०४/२०२५

**(मार्फत ॲड श्री. आय बी नागरे गेवराई)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**सहायक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय,क.स्तर, गेवराई**

**(स्वाक्षरीत)** **शिक्का**
**क.लिपीक**

### वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि. बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री. एस.पी. वानखडे यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक २१३/२०२५ सुविधा संजय जोशी विरूध्द निरंक**

ज्याअर्थी मयत नामे संजय पि सोमेश्वर जोशी हे / हया दिनांक २२/०१/२०२३ रोजी केशव राज गल्ली / जोशी गल्ली ता. गेवराई, जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार क. १. सुविधा भ्र. संजय जोशी वय-५५ वर्षे, धंदा- घरकाम, रा. केशवराज गल्ली, गेवराई, ता. गेवराई जि. बीड, २ . तेजल भ्र गणेश मोटे, वय - ३४ वर्षे, धंदा- घरकाम रा. मोटे गल्ली गेवराई, ता. गेवराई जि. बीड, ३. मनाली भ्र कुणाल टक्केकर, वय - ३० वर्षे, धंदा -घरकाम, रा. सव्हे नं ८५/८३ साईनाथ वसाहत, शास्त्री नगर, कोथरूड, शंकर मंदिराजवळ, पुणे शहर पुणे, महाराष्ट्र यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदर अर्जदारांच्या सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत **संजय पि. सोमेश्वर जोशी** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनांक ०६/०३/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**पुढील तारीख १७/०४/२०२५**
**(मार्फत ॲड. नागरे आय. बी. गेवराई)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**सहायक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय,क.स्तर, गेवराई**

**(स्वाक्षरीत)** **शिक्का**
**क.लिपीक**

### जाहीर नोटिस

**श्री. एन. एम. वाली, दिवाणी न्यायाधिश क. स्तर, धारुर यांचे न्यायालयात**

**दिवाणी चौकशी अर्ज क. ७५/२०२५ निशाणी क्र. १२/ड**

अर्जदार - १. सुमनबाई भ्र. ग्यानबा उर्फ गेनबा दराडे वय ७५ वर्षे धंदा घरकाम रा. सोनीमोहा ता. धारुर जि. बीड. २. सुदाम पि. ग्यानबा उर्फ गेनबा दराडे वय ७५ वर्षे धंदा घरकाम रा. सोनीमोहा ता. धारुर जि. बीड. ३. रंदावणी भ्र. सायसराव दराडे वय ६५ वर्षे धंदा घरकाम रा. सोनीमोहा ता. धारुर जि. बीड. ४. सुनिता भ्र. जालिंदर मुंडे वय ५१ वर्षे धंदा घरकाम रा. चारदरी ता.धारुर जि. बीड.

विरुध्द

सामनेवाला - कोणीही नाही

तमाम जनतेस या जाहिरनामा / जाहिरनोटीस द्रवारे असे कळविण्यात येते की, ज्या पेक्षा मयत **ग्यानबा उर्फ गेनबा पि. कृष्णा दराडे रा. सोनीमोहा ता. धारुर जि.बीड यांचे दिनांक १८/१२/२०२३ रोजी मौजे सोनीमोहा ता. धारुर जि. बीड** येथे निधन झालेले आहे. त्यांना अर्जदार हे एकमेव कायदेशीर वारसदार आहेत..

मयत ग्यानबा उर्फ गेनबा पि. कृष्णा दराडे यांचे पश्चात शासकिय/निमशासकिय व इतर कार्यालयीन कामासाठी अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता अर्जदार हे मयत ग्यानबा उर्फ गेनबा पि. कृष्णा दराडे यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषीत करुन वारस प्रमाणपत्र देणे बाबत कुणाचीही अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी हि जाहिर नोटीस प्रसिध्द झालेले तारखेपासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे न्यायालयात प्रत्यक्ष अथवा वकिलांमार्फत हजर होउन लेखी अथवा तोंडी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात दाखल करावयाच्या आहेत. वरीलप्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केल्या नाही. तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करुन पुरावाव घेउन मे न्यायालयात अर्जदार यांचे नावे वारस दाखला प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

आज तारीख १०/०३/२०२५ रोजी आमचे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्यानिशी दिला.

**प्रकरणात पुढील दिनांक : २२/०४/२०२५**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**सहायक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय,क.स्तर, धारूर**

**(स्वाक्षरीत)** **शिक्का**
**क.लिपीक**

### जाहीर प्रगटन

**धारुर येथील श्रीमती नुतन सचिन कदम सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर धारुर**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ७९/२०२५, कालिंदा भुजंग देठे व इतर वि. निरंक**

मयताचे नाव :मयत **भुजंग पि. किसन देठे** रा. आंबेवडगाव ता.धारूर जि. बीड हे दि. ०५/०७/२०२२ रोजी मयत झालेले आहेत. आणि त्यांचे वारस अर्जदार

१. कालिंदा भ्र. भुजंग देठे वय ७० वर्षे धंदा-घरकाम रा. आंबेवडगाव ता.धारूर जि. बीड. २. श्रीकृष्ण पि.भुजंग देठे वय ४५ वर्षे धंदा-शेती रा. आंबेवडगाव ता.धारूर जि. बीड, ३. अर्जुन पि.भुजंग देठे वय २५ वर्षे धंदा-शेती रा. आंबेवडगाव ता.धारूर जि.बीड

यांनी या न्यायालयास मयत **भुजंग पि.किसन देठे** रा. आंबेवडगाव ता.धारूर जि. बीड. हे मयत झाले असून त्यांच्या पश्चात अर्जदारास शासकीय योजनेचा लाभ घेण्याकरीता, व इतर महत्त्वाच्या कामकाजाकरीता, अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज या न्यायालयाकडे केला आहे. त्यापेक्षा अर्जदार

सदरहु अर्जदार मयताचे वारस नव्हे असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत **भुजंग पि. किसन देठे** रा. आंबेवडगाव ता.धारूर जि. बीड यांचे वारसांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनांक : ०७/०३/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**पुढील तारीख : १०/०४/२०२५**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**सहायक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय,क.स्तर, धारूर**

**(स्वाक्षरीत)** **शिक्का**
**क.लिपीक**

### जाहीरनामा

**धारुर येथील श्रीमती ए.बी.जोंधळे २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर धारुर**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ८०/२०२५,जनाबाई वि. निरंक**

मयताचे नावे **मयत दत्तात्रय पि. देविदास कदम** मौजे धारूर ता. धारुर जि.बीड हे दिनांक २०/०६/२०१८ रोजी मयत झाले आहेत.

त्यांच्या पश्चात अर्जदार क्र. १ जनाबाई भ्र. देवीदास कदम, वय : ८० वर्षे, धंदा बसुन रा. धा- ता. धारूर जि. बीड अर्जदार क्र. २ सिताबाई भ्र. दत्तात्रय कदम वय ५५ वर्षे धंदा शेती रा धारूर धारूर जि बीउ अर्जदार क ३ लहु पि. दत्तात्रय कदम वय २९ वर्षे धंदा शेती रा धारूर ता. धारूर जि. ब अर्जदार क ४ अंकुश पि. दत्तात्रय कदम वय २८ वर्षे धंदा शेती रा. धारूर ता धारूर जि बीड हे अर्ज क १ मयताची आई असुन अर्जदार क २ ही मयताची पत्नी व अर्जदार क ३ व ४ ही मयताची मुले आहेत. या नात्याने मयत **दत्तात्रय पि. देविदास कदम** या नात्याने त्यांना शासकीय, निमशासकीय व जमीन इतर मिळकतीला वारस आधारे आवश्यक गरजेकरीता, वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत दत्तात्रय पि. देविदास कदम यांचे वारस नव्हे अ कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हज होवुन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत **दत्तात्रय पि. देविदास कदम** यांचे वारसाना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनांक ०७/०३/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**पुढील तारीख : १६/०४/२०२५**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**सहायक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय,क.स्तर, धारूर**

**(स्वाक्षरीत)** **शिक्का**
**क.लिपीक**

### जाहीरनामा

**धारुर येथील श्रीमती ए.बी.जोंधळे २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर धारुर**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.५३/२०२५, राहीबाई व इतर २ वि. निरंक**

मयताचे नावे मयत मनोहर पि. गंगाराम मायकर हे दिनांक १२/१२/२०२३ रोजी रा. चारदरी ता. धारुर जि.बीड येथे राहत्या घरी मृत्यू झालेला आहे.

त्यांच्या पश्चात अर्जदार क्र. १ राहीबाई भ्र मनोहर मायकर, वय : ७५ वर्षे, धंदा घरकाम रा. चारदरी ता. धारुर जि. बीड, अर्जदार क्र. २ राजाभाऊ पि.मनोहर मायकर, वय ५६ वर्षे, धंदा शेती, रा. चारदरी ता धारूर जि. बीड, अर्जदार क्र. ३ मिरा भ्र गोरक भैरट, वय ५० वर्षे धंदा घरकाम रा. उमरी ता. केज जि बीड अर्जदार क १ ही मयताची पत्नी अर्जदार क २ हा मयताचा मुलगा आहेव अर्जदार क ३ ही मयताची मुलगी आहेत. या नात्याने मयत मनोहर पि.गंगाराम मायकर या नात्याने त्यांना घर, जमीन व इतर मिळकतीला वारस आधारे अर्जदाराच्या नावाची नोंद करण्यासाठी व शासकीय, निमशासकीय व इतर आवश्यक गरजेकरीता, वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज या न्यायालयाकडे केला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदार क. १ व ३ हे मयत मनोहर पि.गंगाराम मायकर यांचे वारस नव्हे असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत मनोहर पि. गंगाराम मायकर यांचे वारसांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनांक : १७/०२/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**पुढील तारीख : २७/०३/२०२५**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**सहायक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय,क.स्तर, धारूर**

**(स्वाक्षरीत)** **शिक्का**
**क.लिपीक**

CMYK

दैनिक
● epaper.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

बुधवार, दि.१२ मार्च २०२५ पान ४

## नियमबाह्य मुद्रांक विक्री केल्यास परवाना रद्द करणार

किल्ले धारूर । प्रतिनिधी

मुद्रांक विक्रेत्यांनी न्यायालयीन फी न्यायालयीन तिकिटाचा साठा ठेवण्यासह मुद्रांक विक्री करत असताना नियमबाह्य प्रकारे मुद्रांक विक्री ची तक्रार आल्यास चौकशीत मुद्रांक विक्रेते दोशी आढळल्यास मुद्रांक परवाना रद्द करण्याची तंबी या कार्यालयाकडून देण्यात आली आहे. राज्य शासन तसेच केंद्र शासनाच्या सध्या ग्रामीण भागात विशेष योजना सुरू आहेत. या योजना पूर्ण करण्यासाठी जी कागदपत्रे जुळवाजुळवी करावी लागते त्यात अनेक ठिकाणी बाँड नागरिक आणि शेतकऱ्यांना नोटरी करून द्यावा लागत आहे. या ठिकाणी शंभर रुपयांच बाँड शासनाने रद्द केलेला असल्याने थेट पाचशे रुपये किमतीचा बाँड खरेदी करावा लागतोय. ५०० चा बाँड खरेदी करत असताना मुद्रांक विक्रेत्यांकडून सर्वसामान्यांना लुटण्याचा प्रकार सुरू आहे. अव्वाच्या सव्वा किमतीला मुद्रांक विक्रेते बाँड विक्री करतात त्यातून सर्वसामान्यांना ▶▶ उर्वरित पान २ वर

# महिलांनी शिक्षणाबरोबर आपल्या पाल्याला सुसंस्कारांची सांगड घालावी : प्राजक्तताई धस

## पुरूष युवा पत्रकार संघाने महिलांचा सन्मान केला त्यांचे कार्य कौतुकास्पद : उपविभागीय अधिकारी वसिमा शेख

## आष्टी येथे नारी सन्मान पुरस्काराने कर्तबगार 30 महिलांचा सन्मान



आष्टी । प्रतिनिधी

महिलांनी चूल आणि मूल यापुरते मर्यादित न राहता शिक्षणाबरोबर संस्काराची सांगड घालावी आणि कौटुंबिक आर्थिक परिस्थितीच्या प्रगती करण्यासाठी महिलांनी पुरुषाच्या बरोबर आपला संसाराचा गाडा अधिक जोमाने न्यायला पाहिजेत. तसेच आपल्या मुलामुलींच्या शिक्षणासह सोबत संस्काराकडे लक्ष दिले पाहिजे.मुलींनो सैराट चित्रपट पहा पण सैराटचा शेवटचा भाग दहावेळा पहा त्यामुळे विचार करून निर्णय घ्यावा आणि आपल्या शिक्षणाकडे अधिक लक्ष केंद्रित करून काही तरी अधिकारी होण्यासाठी प्रयत्न करा तर आज महिला सर्वच क्षेत्रात प्रगती करत असून देश महासत्ता होण्यासाठी महिलांचा सहभाग महत्त्वाचा आहे. ग्रामीण भागातील महिलांनी व्यवसायासह अत्याधुनिक शेती व नोकरी आदी क्षेत्रात आपले स्थान अधिक मजबूत करणे गरजेचे आहे आणि महिलांचे सक्षमीकरण व सशक्तीकरण काळाची गरज असल्याचे प्रतिपादन महानंदा दूध संघ मुंबईच्या संचालिका प्राजक्तताई सुरेश धस यांनी आष्टी येथे केले.

आष्टी येथील पंचायत समितीच्या सभागृहात आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने सोमवार दि १० मार्च रोजी जागतिक महिला दिनानिमित्त ३० विविध क्षेत्रातील कर्तबगार महिलांचा राज्यस्तरीय नारी सन्मान पुरस्कार सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपविभागीय अधिकारी वसीमा शेख ह्या होत्या तर प्रमुख उपस्थिती म्हणून महानंदा दूध संघ मुंबईच्या संचालिका प्राजक्तताई धस, तहसीलदार वैशाली पाटील, गटविकास अधिकारी गोकुळ बागलाणे,

▶▶ उर्वरित पान २ वर

### युवा पत्रकार संघाचा आदर्श इतरांनी घ्यावा – तहसीलदार वैशाली पाटील

**बालविवाह रोखण्यासाठी पालकांचा सहभाग महत्त्वाचा आहे त्यासाठी बालविवाह प्रतिबंधक कायद्यांची माहिती सर्व पालकांपर्यंत पोहचून याबाबत जनजागृती करणे महत्त्वाचे आहे तर युवा पत्रकार संघाचे कार्य कौतुकास्पद असून त्यांनी आष्टी तालुक्यात सामाजिक उपक्रम मोठ्या प्रमाणावर राबवले आहेत तसेच सर्वसामान्य गोरगरीब अन्याय विरोधात वाचा फोडण्याचे काम करत आहेत.आज प्रत्येक क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत. अनेक महिला ह्या उत्कृष्ट कार्य करून ही त्यांची दखल घेतली गेली नव्हती. आज युवा पत्रकार संघाने कर्तुत्वान महिलांचा खऱ्या अर्थाने सन्मान करून त्यांना न्याय दिला. त्यामुळे युवा पत्रकार संघाचा आदर्श इतरांनी घ्यावा असे प्रतिपादन तहसीलदार वैशाली पाटील यांनी केले.**

### या महिलांचा झाला पुरस्काराने सन्मान...

**वैशाली मुकुंद साबळे (आदर्श माता ),रेखा भाऊसाहेब घुले(आदर्श शेतकरी महिला ),वंदना परिवंत गायकवाड (आदर्श महिला सरपंच), ब्रह्मकुमारी सुशिला बहेनजी (आध्यात्मिक समाजकार्यातील उत्कृष्ट महिला),कु.डॉ.शेख मेहविश आरा (आदर्श महिला वैद्यकीय अधिकारी), कीर्ती हांगे (आदर्श महिला शिक्षिका), ड स्वाती राजेंद्र जाधव (आदर्श शैक्षणिक व समाजकार्य ), श्रीमती कवडे अनिता साहेबराव (आदर्श ग्रामसेविका), अंकिता राजेंद्र जाधव ( आदर्श ग्राम महसूल अधिकारी), ज्ञानेश्वरी शंकर लांडे (आदर्श पशुधन पर्यवेक्षक महिला अधिकारी), ह भ प पुष्पाताई उमेश जगताप (उत्कृष्ट समाज प्रबोधनकार महिला), दिपाली अशोक काकडे (उत्कृष्ट खेळाडू), बावदाणकर संजीवनी सोपान (आदर्श कृषी सहाय्यक महिला), रुक्मिणी संपत मराठे (आदर्श अंगणवाडी सेविका), सुनिता रामदास जगताप (आदर्श आशा वर्कर), अंजली दिगंबर वाघमारे (उत्कृष्ट सुपरवायजर), सोनाली रुपेश उपाध्ये (उत्कृष्ट महिला उद्योजिका), ड पुष्पा भगत– गायकवाड (आदर्श महिला विधीज्ञ ), विजया मुळे (आदर्श समाज कार्य महिला) शिवनेरी महिला बचत गट पांढरी (आदर्श महिला बचत गट), वंदना सुरेश भैसाडे (आदर्श परिचारिका), वैष्णवी नामदेव रांगुळे (आदर्श कवियत्री), पूजा बिबीषण देवळकर– धोंडे (आदर्श महसूल सेविका), अर्चना सुभाष आरडे (उत्कृष्ट महिला पोलीस कर्मचारी), कल्पना गणेश पाटील (आदर्श सून ), सविता उगले (आदर्श सेविका), कोमल थेटे ( उत्कृष्ट रांगोळी महिला आर्टिस्ट), सुनिता नाथा शिंनगारे (उत्कृष्ट आशा वर्कर), सौ. ज्योती संजय पवार आदर्श अबॅकस शिक्षिका,श्रीमती वेणूबाई विलास केसकर आदर्श स्वयंपाकी या विविध क्षेत्रातील महिलांना शाल, सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह व फेटा बांधून 'नारी सन्मान २०२५' हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.**

# पक्षांसह वृक्ष संवर्धनासाठी विद्यार्थ्यांचा पुढाकार

## पक्षांसाठी झाडावर पाणवठे तर झाडांसाठी ठिबक सिंचन ; कोळेश्वर विद्यालयाचा उपक्रम



### झाडे लावा झाडे जगवा यासह पक्षी संवर्धनाची विद्यार्थ्यांमध्ये आवड


**तहानलेल्या पक्षांसाठी शाळेच्या आवारात असलेल्या झाडावर पाण्याच्या कुंड्या बांधल्या आहेत. यामुळे विविध पक्षांचा शाळेच्या आवारात सतत किलबिलाट पहायला मिळतो. तसेच नवीन वृक्ष भर उन्हाळ्यात देखील संगोपन झाले पाहिजे यासाठी टाकाऊ बाटल्यापासून झाडांना सिंचणाप्रमाणे पाणी दिले जाते. या उपक्रमामुळे झाडे लावा, झाडे जगवा यासह पक्षी संवर्धनाची एकप्रकारे विद्यार्थ्यांमध्ये आवड निमाण होत आहे.– किशोर निकम, कला शिक्षक, नुतन कोळेश्वर विद्यालय**

गेवराई । प्रतिनिधी

तिव्र उन्हाळा सुरु झाल्यामुळे पाण्याची टंचाई जाणवत आहे, अशा परिस्थितीत शाळेच्या परिसरातील लहान वृक्षांचे संगोपन करून निसर्गाचा समतोल राखण्यासाठी तसेच वृक्ष व पक्षी संवर्धन करणे ही काळाची गरज आहे, हा उदात्त हेतू समोर ठेवून गेवराई तालुक्यातील कोळगाव येथील कोळेश्वर विद्यालयातील विद्यार्थ्यांनी नाविण्यपूर्ण उपक्रम राबविला आहे. शाळेच्या परिसरातील झाडांसाठी ठिबक सिंचन करुन वृक्ष संगोपन केले जात आहे. तसेच पशुपक्षांसाठी याच झाडांवर पाणवठे बांधण्यात आले आहेत. या उपक्रमामुळे भर उन्हाळ्यात पक्षांची तहान भागविली जात आहे, त्याचबरोबर वृक्ष देखील होत आहे.

उन्हाळ्यात पक्षी व वृक्षांचे संवर्धन करण्यासाठी गेवराई तालुक्यातील कोळगांव येथील कोळेश्वर विद्यालयातील राष्ट्रीय हरित सेनेच्या विद्यार्थ्यांनी पुढाकार घेवून विद्यालयाच्या परिसरातील मोठ्या झाडांवर पाण्याच्या कुंड्या अडकवून उन्हाळ्यात पक्षांची तहाण भागविव्याचा उपक्रम राबविला जात आहे. पक्षांसाठी पाण्याची व्यवस्था झाल्यामुळे पाणी ▶▶ उर्वरित पान २ वर

# प पु माधवानंद महाराज यांच्या हस्ते दत्तधामच्या दत्तमंदिराचा कलशारोहन



बीड । प्रतिनिधी

शहरातील दत्तधाम येथील नव्याने उभारण्यात आलेल्या श्रीदत्त मंदिराच्या शिखराचे बांधकाम अवघ्या दोन महिन्यात पूर्ण झाले,२६ डिसेंबर २४ रोजी श्रीदत्त मूर्तीची प्राणप्रतिष्ठा मोठ्या उत्साहात पार पडली होती त्याच वेळी या भागातील भाविकांनी एकत्र येऊन शिखराचे कामही पूर्ण करून घेतले दि ९ फेब्रुवारी २५ रोजी प पु माधवानंद महाराज यांच्या शुभहस्ते कलशारोहन करण्यात आले यावेळी हजारो भाविकांची उपस्थित होती.

दत्तधाम येथील श्री दत्त मंदिराचे काम गेल्या वर्षभरापासून सुरू होते हे काम डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात पूर्ण झाल्यानंतर २६ डिसेंबर रोजी या मंदिरात अत्यंत सुंदर आणि आकर्षक अशा श्री दत्त मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली याच कार्यक्रमात मंदिराच्या शिखराचे कामही लवकरच पूर्ण करण्याचा मणस भाविकांनी बोलून दाखवला होता त्यानुसार शिखराचे बांधकाम देखील पूर्ण करण्यात आले या मंदिराच्या शिखराचे हे वैशिष्ट्य आहे की या मंदिराच्या शिखरावर बीड जिल्ह्यातील वैकुंठवासी संतांच्या मूर्ती बसवण्यात आल्या आहेत,बांधकाम सुरू असतानाच उमरखेड संस्थानचे मठाधिपती गुरू माधवानंद महाराज दत्तदर्शनासाठी मंदिरात आले होते त्याचवेळी मी बीडमध्ये आहे तोपर्यंत शिखराचे काम पूर्ण करा मी स्वतः येतो असा शब्द दिला होता त्यानुसार या भागातील भाविकांनी लगेच नियोजन करून दि ९ फेब्रुवारी रोजी कलशारोहन

▶▶ उर्वरित पान २ वर

# विकासकामे दर्जेदार करण्यासाठी ग्रामस्थांनी सहकार्य करावे : रणवीर पंडित

## बोरगाव येथे ग्रामपंचायत इमारत बांधकामाचा भव्य शुभारंभ



गेवराई । प्रतिनिधी

लोकांनी मोठ्या विश्वासाने आपल्याला निवडून दिले आहे. विजय काका आमदार झाले आहेत, त्यामुळे आता रखडलेली विकासकामे गतीने पुर्ण होतील. होणारी कामे दर्जेदार केली जातील. आपल्या सहकार्याची गरज असून आपल्या गावात होणारी विकासकामे दर्जेदार करण्यासाठी सर्वांनी समन्वयांनी काम करण्याचे आवाहन शारदा स्पोर्ट्स कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांनी केले. बोरगाव येथे विविध विकास कामांचा शुभारंभ करताना ते बोलत होते.

गेवराई विधानसभा मतदारसंघातील मौजे बोरगाव नवे, बोरगाव जुने व बरड येथे नुतन ग्रामपंचायत इमारत बांधकामाचा शुभारंभ मंगळवार दिनांक ११ मार्च रोजी शारदा स्पोर्ट्स कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे संचालक नंदकिशोर गोर्डे, विश्वांभर गोरडे, सुभाष गोर्डे, सरपंच एकनाथ बनसोडे, अशोकराव जाधव, अनिल जाधव, भाऊसाहेब खंदारे, शंकरराव जाधव, परमेश्वर जाधव, अशोक पाटील, वैजनाथ जाधव, विनायक जाधव, बाळु आवारे, तुकाराम जाधव, रमेश जाधव, रविंद्र जाधव, बाळु जाधव, कल्याण नलावडे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राहुल जाधव यांनी केले. ▶▶ उर्वरित पान २ वर

# वित्त व नियोजन मंत्री पालकमंत्री बीड अजितदादांनी 82 आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना आणि जलजीवन मिशनच्या कामांना निधी द्यावा

## मागणीसाठी लक्ष्यवेधी विकासाचे गाजर वाटप आंदोलन : डॉ.गणेश ढवळे



लिंबागणेश । प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार राज्याचा वर्ष २०२५–२६ चा अर्थसंकल्प सादर करणार असून बीड जिल्ह्यातील ८२ आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीय शासकीय मदतीपासून वंचित असुन त्यासाठी आवश्यक १ कोटी ३२ लाख रूपयांच्या निधीची मागणी जिल्हा प्रशासनाने शासनाला दोन महिन्यांपासून केलेली असुनही अद्याप निधी मिळाला नाही. बीड जिल्ह्यातील जलजीवन मिशनच्या कामांसाठी निधीचा तुटवडा निर्माण झाला असुन २५० कोटी रुपयांचा निधी शासनाने द्यावा अशी जिल्हा प्रशासनाकडुन शासनाला मागणी करण्यात येऊन केवळ १४ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला असुन तातडीने उर्वरित निधी देण्यात यावा या प्रमुख मागण्यांकडे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांचे लक्ष्य वेधण्यासाठी आज दि.१० सोमवार रोजी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली अजितदादांच्या विकासाचे गाजर वाटप लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात येऊन जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत अजितदादा पवार यांना निवेदन देण्यात आले.यावेळी आंदोलनात रामनाथ खोड,शेख युनुस, सुदाम तांदळे, शिवशर्मा शेलार ,,शेख मुबीन,शेख मुस्ताक, पांडुरंग हराळे, बीड जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी अशोक येडे, बीड जिल्हा सचिव इंटक सखाराम बेंगडे आदी सहभागी होते. बीड जिल्ह्यात १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत २०५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची शासन दरबारी नोंद आहे.यापैकी १०८ कुटुंबियांना मदत देण्यात आली असुन ६३ जणांना मिळणे बाकी आहे. मागच्या वर्षातील ६३ आणि चालु वर्षातील १७ अशी एकुण ८२ आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीय शासकीय मदतीपासून वंचित आहेत. महाराष्ट्र राज्याच्या तिजोरीची चावी हाती

▶▶ उर्वरित पान २ वर

# श्रीसर्वतीर्थ सेवा महानुभव आश्रम बक्तरपुर द्वारा स्थानवंदन पदयात्रेचे लिंबागणेश येथे जल्लोषात स्वागत



लिंबागणेश । प्रतिनिधी

महानुभव पंथाचे संस्थापक,थोर समाजसुधारक तत्वज्ञ चक्रधर स्वामी यांच्या आदरणीय परमपूज्य महंत कानळसकर बाबा महानुभव यांच्या मार्गदर्शनाखाली दि.६ मार्च रोजी आष्टी तालुक्यातील वाकी येथुन शुभारंभ झालेली पदयात्रा शिराळा, पारगाव जोगेश्वरी आष्टी,मातकुळी,वनदेव,रामदरा,सौताडा,साकत, पाटोदा, वैद्यकिन्ही,लिंबागणेश,पोहिचा देव,पाली आणि बीड येथे समाप्ती होणार आहे. पदयात्रेचे हे विसावे वर्ष आहे. श्रीसर्वतीर्थ सेवा महानुभव आश्रम बक्तरपुर स्थानवंदना पदयात्रेचे आज दि.११ मंगळवार रोजी सकाळी बीड तालुक्यातील लिंबागणेश नगरीत घरासमोर रांगोळी, औक्षण करत आतीशबाजी करत जल्लोषात स्वागत करण्यात आले.

▶▶ उर्वरित पान २ वर

CMYK